म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : का.वा.
दा. क्र. : १७३८



# बोभाटा

वाचनालय
१७३९
२२।१२।८४

सौ. मुमताज रहिमतपुरे

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६ ००८

बोभाटा Bobhata

सौ. मुमताज रहिमतपुरे Sou. Mumataj Rahimatpure

प्रकाशन क्रमांक ३४ प्रथम आवृत्ती १९८४

प्रकाशक /
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडेमाळ,
प्रतिभानगर पिछाडीस, सागरमाळ,
कोल्हापूर–४१६००८

मुद्रक /
दि. गं. कुलकर्णी
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६००३
फोन : २३९०६

मूल्य / रु. ५ फक्त

© इकबाल कासिम रहिमतपुरे

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर, गाळा नं. २० प्रतिभानगर मार्केट
सागरमाळ, कोल्हापूर–४१६००८

म. ग्रं. सं. ठाणें,
बाल वाङ्मय विभाग
क्र. १५३८ दिनांक ....
विषय ........ [illegible]

# बोभाटा

म्हादबा आणि ग्यानबा दोघं जिवलग दोस्त. रोज दोघं पिंपळाच्या पाराखाली बसायची. गप्पा मारायची. एखादा विषय हुडकून कांढायचा आणि मग त्या विषयावर दोघंपण तंडत बसायची. एकमेकांचं म्हणणं हिरीरीनं मांडायची.

पानाला चुना लावता लावता म्हादबा बोलला, ' काय बी म्हण लेका, बायकाच्या पोटात काय बी रहात नाय. '

ग्यानबा पुटपुटला, 'आरं कशाबद्दल बोलतूस रं? 'म्हादवा सावरून वसत म्हणाला, ' आरं तेच रं. बायकाना एखादी गोष्ट गुपीत म्हणून ठेवायला सांगितली की त्याचा साऱ्या गावभर बोभाटा करत्यात. '

ग्यानबा म्हटला, ' हे काय खरं नव्हं मर्दा. बायकांना इश्वासात घेतलं की ह्याक काम हुतयं. '

म्हादबा नकारार्थी मान हालवत पुटपुटला, ' मला तुजं म्हननं पटत नाय. माजच खरं ! '

ग्यानबा म्हणाला, ' आन् मला तुजं म्हननं पटत नाय. '

दोघं आपलं म्हणणं सोडायला तयार नव्हती. शेवटी म्हादबानं एक तोड काढली आणि ग्यानबानं ती मान्य केली.

ग्यानबाला म्हादबाचं म्हणणं पटत नव्हतं म्हणून आता खुद्द ग्यानबानंच या गोष्टीचा शहानिशा करून घ्यायचा होता.

ग्यानबा उठला. मानसाच्या डोक्याच्या आकाराचं एक कलिंगड घेतलं. त्याला व्यवस्थित माणसाच्या डोक्यासारखं बनविलं.रातीचा घरी तो परतला.माडीवरच्या अंधाऱ्या खोलीत, त्या खोटच्या मुंडक्याला टांगून ठेवलं.


बायकोनं जेवायला हाळी दिली. तरी तो गप्पच. मग बायको हाका मारून दमली. त्याच्याजवळ ती गेली आणि झटक्यात म्हणाली, ' काय आक्रीत का काय म्हणावं, माणसाला ऐकू बी ईना का? ' चला बघू लवकर जेवायला.

ग्यानबानं आपला चेहरा आणखीण केविलवाणा केला. मग इकडं तिकडं कानोसा घेत तो फिरू लागला. बायकोला हे सारं अचाट वाटायला लागलं. न रहावून ती परत बोलली, आवो असं घाबरल्यावानी काय करतासा ?

मग दम घेत, ग्यानबानं बायकोला एका हातानं खाली बसवलं. मग तिच्याकडं बघत तो बोलला, ' हे बग कारवारनी, मी सांगतो ती गोष्ट तुझ्या पोटात ठेवशील न्हवं. '

तिनं मान डोलाविली. तिचीही उत्सुकता वाढली होती. आता आपला नवरा काय सांगतो ते ऐकायची. परत ग्यानबानं तिला विचारलं. खात्री करून घेतली. मग तिला शपथ घ्यायला

लावली आणि सरते– शेवटी तो कुजबुजत म्हणाला, ‘ हे बघ, तर काय दिसतंय तुला ? ’



तिनं वर बघितलं, तर आढ्याला गोलसर काहीतरी टांगलं होतं. तिचा ऊर धपापू लागला.

ग्यानबा हळूच पुटपुटला, ‘ते माज्या दुशमनाचं शिर हाए. साला, लई तरास देत हुता. मग माजं डोस्कच फिरलं. आणि रागाच्या भरात त्याच्या अंगावर चालून गेलो, त्याचं शीरच्च कापून घेतलं आणि आता ते हितं टांगलयं मी. ’

एवढं बोलून तो बारकाईनं आपल्या बायकोस न्याहाळू लागला. तिच्या अंगावर भीतीनं सर्रकन काटा आला. आवाज कापरा बनला. ती भीतीनं ओरडणारच होती, पण कसंबसं बोलली, ' असं काय वो वंगाळ केलंसा. '

ग्यानवा परत म्हणाला– ' आता ह्ये कुणाला दक्कल बोलू नको. नायतर मी फासावर चढीन. '

ती विचारी घाबरून घट्ट झाली. ही गोष्ट बाहेर कोणाला बोलली तरी तिचा नवरा फासावर जाणार होता. तिचं कुंकू मग पुसलं जाणार होतं. आपणं हे कोणाला होलायचं नाही असा तिनं निश्चय केला.

चार दिवस झाले. साऱ्या घरात चिडीचीप होतं. ग्यानबाची कारभारीन खाली मान घालून सारी कामं चितागती होऊन करायची. माडीवरच्या दाराकडं सारखी तिची नजर वळायची. माडीवरच्या खोलीला तिनं कुलूप ठोकलं होतं. ग्यानवा बायकोचं वागणं बघून मनात हसायचा. चार दिवस ती कोणालाच बोलली नव्हती. ग्यानबाला वाटलं आपुनच पैज जिंकणार.

ग्यानबाची बायको सतत विचार करायची. ही गोष्ट कुणाला बोलायची नाही हा तिचा निर्धार होता. पण एवढं मोठ्ठं नवऱ्याचं गुपीत तिच्या पोटातून उसळी मारून तोंडापर्यंत येत होतं. हा नवऱ्याच्या जीवाचा प्रश्न होता.

पाचव्या दिवशी ती नदीवर कपडे धुवायला गेली. ती आणि तिची जिवाभावाची मैत्रिण कौशल्या होती. दोघी गपचिप

धुनं धुत होत्या.कौशल्या म्हणाली, ' काय ग द्रुपदा; आज त्वांड का मिटलयं ग ! '

द्रुपदा न रहांवून म्हणाली, 'काय करायचं कौशा, नवऱ्याचा परांण संकटात हाय–

द्रुपदानं कान टवकारले. संशयाने तिच्याकडे बघत ती मानभावीपणाणं म्हणाली, ' एवढं काय ग आकाश कोसळलंय संकटाचं, तुझ्या नवऱ्यावर. '

द्रुपदा सावध झाली. गपचीप झाली. कौशा रागानं मान वळवीत झटक्यात म्हणाली, ' सांगायचं असलं तर सांग. मी जिवाची मैत्रीण म्हणून इचारलं. दुसऱ्याला सांगितल्यानं दुक कमी होतं म्हणून. '

द्रुपदानं ओळखलं कौशा रागावली. तिची अजीजी करत ती म्हणाली, ' रागावू नको कौशा. अग तसाच परसंग आलाय् म्हणून मी गप्प झालो. '

' मग सांग की मला. '

' तू दुसऱ्या कोनाला सांगणार नाहीस. '

' नाय बा, गळ्या शपथ. तू माझी एवढी मैतरीन, मग मी आन् तू काय वेगळं हावोत. बिनदिकत सांग. गळ्या शपथ घेतली नव्हं मी. आदी सुटली म्हण. '

द्रुपदाचा भार कमी झाला. ती लगेच सुटली म्हणाली. आणि ते गुपीत अखेर उसळ्या मारून तोंडावाटे द्रुपदाच्या बाहेर

पडलं. आणि कौशल्याच्या पोटात त्यानं जागा घेतली. '

नंतर कौशल्या या पोटातल्या गुपिताच्या भारानं वाकली. आपला भार कमी करण्यासाठी ती आपल्या जीवाभावाच्या मैतरणीच्या कानाला लागली. कुजबुजत ती अहिल्यास म्हणाली, ' द्रुपदाच्या नवऱ्यानं काय केले ठावं हाय तुला. '

ती उत्सुकतेने कान टवकारून नाही म्हटली. अहिल्यालाही ते गुपित समजलं. अहिल्याने ते आपल्या मैत्रिणीला सांगितले. असं करत करत गावातल्या साऱ्या बायांना कळलं आणि त्यांच्याकडून त्यांच्या नवऱ्यांना.

शेवटी सरपंचाला ते कळल्यावर त्यानं ग्यानबाला चावडी-वर घेऊन यायला माणूस पाठविला.

चावडीवर सारा गांव जमला होता. त्याच्यापुढं ग्यानबाला उभं केलं. सरपंचानं ग्यानबाला विचारलं. काय रं ग्यानबा, तुज्या घरांत तू म्हणं तुज्या दुशमनाचं शिर लटकावून ठेवलंयस. '

गर्दीत उभा असलेला म्हादबा हे ऐकून जोरात हसला, तो मोठ्यानं म्हणाला, ' ग्यानबा मी जितलो. '

ग्यानबा आधी घाबरला होता तोहि हंसू लागला. सरपंचा-सकट सारी गर्दी ग्यानबा–म्हादबाकडं पाहू लागली. ग्यानबा एका माणसाबरोबर घरी परतला आणि आपल्या दुशमनाचं ' ते ' शिर घेऊन आला. कलिंगडाचा तो माणसा-सारखा केलेला आकार पाहून सारे जोरात हंसले. मग म्हादबा

बोभाटा

पुढे झाला आणि त्यानं सारी कानी जनतेला सांगितली. साऱ्यानी हसत, मान डोलावत ऐकली. बायका ओशाळल्या. लाजून गेल्या. खाली मान घालून कामाला लागल्या.

म्हादबा ग्यानबापुढं टाळीसाठी हात पुढं करीत म्हणाला, ‘ काय ग्यानबा मी म्हटलं ते खरं की नाय. बायकांच्या पोटात आणि तोंडात कोणतीही गोष्ट राहात नाही.’

ग्यानबानं त्याच्या हातावर टाळी देत म्हटलं, ‘ होय गड्या तुझं म्हननं शंभर टक्के खरं हाय !!’

□ □

# भांडण

एकदा की नाही मज्जाच झाली. झाडू कचरापेटींशी भांडूच लागली. आपल्या झावळ्या पसरून ओरडू लागली. कचरा पेटीच्या अंगावर धांवून धांवून जाऊ लागली.

बिच्चारी ती कचरापेटी– आपलं अंग सावरून गुपचूप कोपऱ्यात बसली होती. या झाडूला एवढं तणतणायला काय झालं! ते तिला कळेनाच पण तिला तिच्या या आक्रस्ताळेपणाचं कारण कसं विचारायचं! कचरापेटी विचार करू लागली.

तोवर झाडू जोरात ओरडली, ‘दूर हो ! दूर हो ! चांडाळणी. येथून मी एवढा सारा रस्ता श्रमून, झाडून काढते, तर तू येथे राहुन या माझ्या श्रमाचं चीज वाया घालवतेस.’

कचरापेटी आपलं अवजड अंग सावरत म्हणाली, ‘असं गं काय करतेस? पण मी कसे काय तुझे श्रम वाया घालवते. ते जरा सांगशील ?’

‘अगं चांडाळणी. तुझा हा घाणेरडा देह घेऊन इथं कोपऱ्यात बसतेस त्यामुळं साफ केलेला रस्ता किती खराब दिसतो बरं. तू इथून जा कशी आपलं काळं तोंड घेऊन. मग पहा मी झाडून स्वच्छ केलेला रस्ता कसा निर्मळ दिसतो तो.’

कचरापेटीला झाडूच्या या मूर्खपणाचं हसूच आलं, पण आपलं हसूं दाबून ती म्हणाली, ' मी जाईन बापडी येथून पण काय गं. तू रस्त्यावर असणारा कचरा आपल्या कायेनं श्रमून जमवून आणणार मग तो ठेवणार कोठे ?'

तणतणत झाडू ओरडली, ' माझं मी पाहीन काय करायचं ते. तू जा पाहू. '

कचरापेटीनं विचार केला. या झाडूला घडलीच पाहिजे थोडी अद्दल. नाहीतरी फारच शेफारून गेलीय ती हल्ली. सारखी आपणास हिडीस फिडीस करते. आपण ती लहान आहे म्हणून गप्प बसतो तर डोक्यांवरच बसलीय ही कार्टी !'

कचरापेटी शांतपणे म्हणाली, ' जाते बरं झाडूताई. पण गरज पडली तर हांक मार मला !' अन् ती तेथून निघून गेली.

झाडू आपलं नाक उडवीत म्हणाली. ' अडलंय माझं खेटर तुला परत बोलवायला. बरं झालं आपलं काळं तोंड घेऊन चालती झालीस ती !'

आनंदानं गुणगुणत तिनं रस्ता स्वच्छ व निर्मळ केला. जमलेल्या कचऱ्याचे छोटे छोटे ढीग तसेच रस्त्याच्या कडेला तिने ठेउल दिले· त्यामुळे तिला वाटले रस्त्याचीशोभाच वाढतेय. नाहीतर ती बघा कचरापेटी आपला अवाढव्य देह घेऊन बसायची एका कोपऱ्यात ठाण मोडून !

हुश्श्य करत झाडू थोडी विसावली. स्त्यावर वर्दळ वाढली होती.लोक कचऱ्याचे ढीग ठिकठिकाणी पाहून नाक मुरडीत पुट-

पुटत होते.' काय रस्त्यातच घाण. कचरापेटी कुठं गायब झालीय.'

इतक्यात कुत्री, डुकरं, कावळे, कचऱ्याच्या ढिगापाशी जमुन मस्ती करू लागले. त्यांनी सारा रस्ता भरून परत कचराच कचरा अस्ताव्यस्त पसरून टाकला.

परत झाडू रस्ता साफ करायला धावली. परत कचऱ्याचे ढीग रस्त्यावर पसरले. सारेजण कचरापेटी कोठे गेली याचाच विचार करत होते. आणि झाडू मात्र रस्ता साफ करून दमली. उलट तोंड करून बसली. मग हळूहळू तिला आपली चूक उमगली.

तिला कळून चुकलं. आपण रस्ता साफ करतो खरं. पण आपण गोळा केलेला कचरा कचरापेटी आपल्या मोठ्या देहात नीट ठेवते. मग नगरपालिकेची कचरा गोळा करणारी गाडी आली की तो कचरा त्याना ती नीट देते. त्यामुळेच तर आपले हलके होते. आपण नुसतं स्वच्छता करून करायचे काय ? कचराही कोणीतरी सांभाळणे आवश्यक आहेच की !

तिनं दीन होऊन हाक मारली, 'कचरापेटी, एऽ कचरापेटी, ये ना ग ! मला क्षमा कर. माझी चूक झाली.'

कचरापेटी झट्कन आली. झाडूला ती ममतेने म्हणाली, 'कळली तुला आपली चूक. आता असं भांडू नकोस. तू आणि मी एका मनानं राहू. मी तुला केव्हांच क्षमा केलीय– मी मोठी आहे ना म्हणून !

□ □

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र ९५०३६ दिनांक 22/12/68
विषय

# पाचोळा

झाडाखाली त्यांचा खेळ रंगात आला होता. गोट्यावर बैदूल आपटत होता. जिंकणाऱ्याच्या चेहऱ्यावर मग हंसू मावत नव्हते. दूर बाजूला शेळ्या होत्या. त्या गपगुमान झाडांचा पाला समोरचे पाय उंचावून ओरबाडत होत्या. खेळातून सवड काढून शेळ्या आसपास आहेत की नाहीत याची पहाणी नजर करायची परत ती खेळात गुंतून पडायची.

रामजी आणि विलास यांचा असा बराच वेळ खेळ रंगला. खेळून दमल्यामुळे भूक लागली होती. दोघानी आपआपल्या भाकरीची फडकी सोडली. भाकरीचा फडशा पडला. दोघं उड्या मारत ओढ्याजवळ आली. ओंजळीनं पोटभर पाणी पिऊन घेतलं. रणरणत्या उन्हात गार पाणी पोटात गेल्यामुळे पोट एकदम गाऽर झालं. तसं दोघानाही वाटू लागलं जरा अंगाला पण थंडावा येऊ द्यावा. दोघांच्या अंगावरची कपडं धोंड्याखाली बसली, आणि रामज्या विलासचं अंग पाण्यात दडलं. पाणी अंगाला लागल्याबरोबर त्यांना तरतरी आली. दोघं पाण्याशी मस्ती करू लागली. डुऽबुक्ऽ डुऽबुक् पाण्यावर पालथी ओंजळ

मारून आवाज काढू लागली. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवू लागली. खळखळून हसू लागली. जरा वेळांत दमल्यावर ओल्या अंगावरच कापडं चढवली.

परत ते रमतगमत झाडापाशी आले. आता मात्र खरोखरच ते दमले होते. दूरवर शेळ्या आपल्याच नादात असल्यासारख्या वाटत होत्या. दोघांच्या डोळ्यावर गुंगी आली होती. रामजा झाडाखाली हात उशाला घेऊन पसरला. विलास बुंध्याला टेकून बसला. विलास बोलला, ' रामज्या लेका, लई कंटाळा आला! ' रामजा हुंकारला.

विलास मरगळून म्हणाला, ' रामजा, एकादी कानी तरी सांग. '

रामजा परत हुंकरला. म्हणून विलासला भिरमिटी आली. तो रामजाकडं झुकला. त्याला दोन्ही हातांनी गदगदा हलविलं. मग मात्र रामजाचा नाईलाज झाला. तो उठून बसला. विलासची बुंध्याची जागा पटकावली. बुंध्याला आरामात टेकून बसत त्यानं विलासकडं पाहिलं. विलास त्याच्या तोंडाकडे टकाटका पहात होता. तसं रामज्याला हसू आलं. विलासही खुषीत आला. तो उत्साहाने म्हणाला, ' रामजा, लेका, खरूखरीच कंटाळा आलाया. एक कानी तरी सांग. मग कंटाळा जाईल दूर गगनात उडून!

रामजा विचारात पडला. कुठली कहाणी सांगावी बरं !

रामजाची नजर माळाकडे गेली. तो तिकडेच पाहु लागला. तसा विलासही पाहु लागला. धुळीचा लोट,

पालापाचोळा स्वत:भोवती गोळा करीत उंचच्या उंच वावटूळ फिरत येत होते. रामजा पुटपुटला. आयला काय मोटं वावटूळ सरकत येतया बघ !'

विलासनं मान डोलावली.

रामजा उत्साहाने म्हणाला, ' वावटूळाब कोन असतया म्हायित हाय ?'

विलास उद्‌टारला ' नाय बा !'

" आरं वावटूळात म्हणं भूत असतया, आपुन कुणाला दिसाय नकू म्हणूनशान त्यो वावटुळात दडतूया: आपल्याच अंगाभोवतो गिरक्या मारीत पळतं. "

विलास आपले डीळे मोठे करीत रामजाचे शब्द कहाणी ऐकल्यासारखे ऐकत होता. त्याला एक प्रश्न पडला म्हणून तो रामजाला म्हणाला,

" सारक्या सारक्या गिरक्या मारून शान, त्या मुताला भिरमिटी येत नाय होय रं रामज्या ?"

रामज्या खदखदून हंसला, उत्तरला– ' येतीया की ! भूत आसलं म्हणून काय झालं ? गिरक्यानं कुणालाही भिरमिटी येणारच ! आणि म्हणूनश्यान वावटूळ देकिल एका लायनीत न्हाय पळत. कुटबी कसंबी सरकतं." थोडं थांबून तो म्हणाला, ' आनीक दुसरी गंमत म्हायीत हाय कां तुला ?'

विलासने नकारर्थी मान हलवली. आता रामजा उत्साहाने शिगोशिग भरला होता. विलासकडे पाहून डोळे मिचकावित हंसत होता. तो म्हणाला, ' मोठी माणसं म्हंत्यात–

' काय? ' न रहावून विलास म्हणाला.

' मोटी मानसं म्हणत्यात की वावटूळात डोळं झाकून उबं ऱ्हायाचं ! '

' ते कशापाई ? '

' सांगून ते ऐक. वावटूळात डोळं झाकून उभं ऱ्हायाचं का ? ' बोलता बोलता समजा डोळं झाकून उभा राहिला. मग पुढे बोलू लागला. " आसं उबं ऱ्हायाचं. हात आसा पसरायचा. हाती पाचोळा आला तर घट्ट मुठीत धरायचा. मग तसंच डुळं मिटून त्यो पाचोळा खड्यात दाबून ठिवून झाकायचा. ह्ये समदं झाल्यावरच डुळं उघडायचं. त्या जागी काय बाय वळकायसाठी खूण ठेवायची.

रामजानं डोळं मिटून सारं बैजवार विलासला करून दाखविलं. जणू वावटुळात उभं राहून त्यानं पाचोळा मिळवला होता. खड्यात पुरला होता. विलास चित्त लावून सारं ऐकत होता. पहात होता. हे सारं सांगून झाल्यावर रामज्या परत बूंध्याला टेकून बसला. तसं विलासनं कुतुहलानं विचारलं, ह्ये समदं केल्यावर काय हुतं रं ? '

" आरं. येड्या, त्या पाचोळ्याचं पिवळंजराद सोनं हुतं ! ! '

विलासने आश्चर्याने आँ वासला. आँऽ "

' आँ काय? आईच्यान्. त्या पाचोळ्याचं सोनं हुतया! '

वावटूळ त्यांच्या दिशेनं सरकत येत होतं. विलासला वावटुळातला पाचोळा हाती घ्यायची हाव सुटली. वावटूळ उंचीनं व घेरानं वाढलं होतं. त्याला पाहून भीतिही वाटत होती. विलासचा चेहरा वाचीत रामजा म्हणाला.

'तूं ऱ्हा वावटुळात उभा. अगदी खांब रोवल्यागत उबाऱ्हा मातूर. गच्च डुळंबी मिटायचं हाँ ! मी हाय इतच. तुझ्या हाती पाचोळा आला की गाडू हत्तच या झाडाखाली. तो पातूर तूं डुळं उगडायचं नाय बग ! मग बगत ऱ्हावं असं त्या पाचुळच्याचं सोनं हूतय ! '

विलास घाबरत म्हणाला, ' पर वावटुळात भून असतया नव्हं ? ' रामजा त्याला धीर देत म्हणाला ,'आरं त्येनंबी डोळं मिटल्यालं असतया. त्येला काय तूं दिसनार नायस ! '



वावटूळ आपल्याच झोकात, तालात, फिरत धुरळा आकाशात उडवित, भिर्रकन येत हुतं.

रामजानं धीर देत विलासला उभं केलं. विलास डोळं गच्च मिटून उभा राहीला. जादा गच्च डोळं मिटल्यामुळं त्याच्या डोळ्यापुढे प्रथम काळ्या रंगाचे ठिपके फिरू लागले. मग निळा रंग दिसू लागला. मग हिरवा.

वावटुन झपाट्यानं गरगरत विलासपाशी आलं. विलास त्यात गुरफटुन गेला. सारं अंग धुरोळ्यात माखून गेलं आणि तोही वावटूळाबरोबर पुढं ओढल्यासारखा पुढे जाऊ लागला. डोळं उघडायचा मोह होत होता. धुळीनं, पाचोळ्यानं अंगाला ओरबाडल्यासारखं होत होतं. त्याला वाटलं भुताची लांब नखं अंगाला बोचकाऱ्या काढताहेत. भीतीची लहर त्याच्या शरीरात चमकली. मनातल्या मनात तो राम म्हणू लागला. पसरलेल्या हातात कांहीतरी आलं. ते त्यानं गच्च मुठीत धरलं. तो वावटूळाबरोबरच गिरगिरीत निघाला.

रामजा ओरडला, 'ईलास,ईलास,जाम खाली बस.' विलास नकळत खाली बसला. एका हातानं जमीन आधाराला धरली.

वावटूळ त्याला मागं टाकून पुढं गेलं. रामजा त्याच्यापाशी धावला. त्यानं उत्सुकतेनं विचारलं. ' मिळाला पाचोळा ? '

डोळे घट्ट पापण्यानं दाबत विलासनं बंद मूठ अंदाजानं रामजापुढं केली. रामजानं इशारा दिला, 'डुळं उगडू नकू बरं?' मग त्याचा दुसरा हात धरून झाडापाशी आणलं. अणकुचीदार

दगडानं त्यानं भराभरा एक खळगा काढला. विलासची बंद मूठ खळग्यापाशी आणली. विलासनं अलगद मूठ मोकळी केली. हातच्या तळव्याला पाचोळ्याची खरखर लागत होती ती कमी झाली. हाताला मऊ मातीचा सुखद स्पर्श झाला. बरं वाटलं. रामजानं तोवर त्या पाचोळ्याच्या तुकड्यावर माती लोटली. विलास घाईकुतीला आल्यासारखा म्हणाला, ' डुळं उघडू ?' शिस्तीत काम झाल्यावर रामजानं हात झाडले.मग म्हणाला 'हं!' विलासने घाईघाईने डोळे उघडले. त्याला मिट्ट अंधारच दिसला. अंधारी आल्यासारखे वाटत होते. खूप वेळ डोळं मिटल्यामुळे त्याला कसंतरी होत होतं. मग हळुहळु त्याला दिसायला लागलं.

रामज्या दिसल्यावर, नुकत्याच लोटलेल्या ताज्या मातीकडे त्याची नजर गेली त्यासरशी खुणेसाठी म्हणून रामज्याने तोच अणकुचीदार दगड खड्यावर दाबून रोवला. मग तो निश्चित झाला. तर विलालने भोळेपणाने विचारले, ' रामज्या , आता त्या पाचोळयाचं सोनं कदी हुणार रं ! '

रामज्या जानत्या माणसासारखा म्हणाला. ' आजपासून बरुबर वर्षानं आपन ह्यो खड्डा उलगडून बगायचा. मंग हत्तं पिवळंजराद सोनं दिसतया. '

विलासनं क्षणभर ते सोनं कसं लखलखत याचा अंदाज बांधला. परत त्याला एक शंका आली.

" रामजा लेका, बरूबर वर्ष कवा संपनार रं ? "

रामजापण गोंधळला. वर्षं कसं मोजायचं हे त्याला तरी कुठं माहीत होतं ! विलास पुढे विचारत होता. ' आनी आदी खड्डा उलगडून बगीतला तर रे ? '

' तर त्यो पाचोळा , पाचोळाच-हातू. सोनं बिनं त्याचं काय बी हुत नाय. ' विलास गप्प बसला. मग रामजा तोड काढीत म्हणाला, ' काळजी कशापाई करायची रं ! आपण आमच्या आजीला सांगू, आजपासून बरूबर कवा वर्षं हुतया ते सांगायला. ती ठेवील मनात मोजुन वर्षाला काय ?

विलासला ही तोड पटली. शेळ्या दूरवर गेल्या होत्या . दोघं आपआपल्या भाकरीची फडकी झटकट उठली. फडकी गळ्यात बांधली. हाती घाण्यारीची छडी घेतली. आणि सोनं, पाचोळा, वावटुळ यांना क्षणात विसरून शेळ्यासाठी अंडारली.

□ □

# मी राधाकृष्ण पहाते

सकाळची शाळा होती. काखेला दफ्तर अडकविले होते. दप्तरामध्ये पाटी, गणित, मराठी, इतिहास, भूगोलाची पुस्तके होती. एका डबीमध्ये रंगीत पेन्सिलीचे, खडूचे, व कांचेच्या बांगड्यांचे तुकडे यांची धनदौलत होती. उजव्या हाताच्या छोटया बहिणीने धरले होते. मी नाचऱ्या पावलांनी शाळेला निघाले होते. बहीण माझ्याबरोबर जवळ जवळ खेचल्यामुळे पळत होती. पावलं पळत होती. मन भ्याले होते. रोजच्यासारखा आज उतारा लिहुन आणला नव्हता. काल सायंकाळी सारखं खेळतच होते. त्या नादात उतारा लिहावयाचा तसाच राहिला होता. आमच्या बाई जितक्या मायाळू तितक्याच कडक होत्या. उतारा लिहून नेला नाही की त्या सरळ पट्टीने हाताचा तळवा लालगुलाबी करून टाकीत. हा रंग कसा चुकवावा ? याची काळजी लागली होती. त्यासाठी माझे मन कारण तयार करण्याच्या नादाला लागले. त्यामुळे मधूनच माझी पावले अडखळायची. मग धावणारी छोटी बहीण नस्सिन माझ्या अंगावर धडके. मनाने एकदाशी कारण तयार केलं. ' - बाई, मी उतारा लिहीला होता पण माझ्या धाकटया बहिणीने नजमाने पुसून टाकला. हो! '

एकदाशी आम्ही शाळेत येऊन ठेपलो. नस्सिम आपल्या वर्गात जाऊन बसली. माझा मोर्चा ४ थी, अ कडे वळला. सगळ्या मैत्रिणींना वर्गात पाहुन आनंदाचे भरते आले. तब्बल एक रात्र आणि सकाळच्या बऱ्याच वेळानंतर त्या भेटल्या म्हणूनच तो आनंद होता. मनातून अजून बाईंची आणि उतारा याची धास्ती होतीच. बाई वर्गात आल्या त्याच हसत हसत. त्यामुळे मुलींचेही चेहरे हसू, बोलू लागले.

हजेरी बुक, पट्टी, खडू टेबलावर ठेवून बाई म्हणाल्या, ' मुलींनो, एक आनंदाची बातमी मी घेऊन आलेय! '

सगळ्या मुली उत्सुकतेने कान टवकारून ऐकू लागल्या.

बाई म्हणाल्या. ' आज शाळेला सुट्टी! '

सगळ्या मुली कोरसात उत्तरल्या 'अय्या! बाई! खरंच शाळेला सुट्टी!'

बाई म्हणाल्या, ' खरंच सुट्टी! आणि आज की नाही आपण सांगलीला सहलीसाठी जायाचं!'

परत ' अय्या हो! ' चा कोरस गरजला.

बाई सांगतच होत्या ' आता सगळ्यांनी घरी जायचं. आई-बाबांची परवानगी सहलीसाठी घ्यायची. प्रत्येकानी सोबत दोन रुपये आणि खाऊचा डबा घेऊन शाळेत दहा साडे-दहापर्यंत यायचं साडेदहापर्यंत आम्ही मुलींची वाट पाहु. जा पळा. लवकर परत या. '

तरीही आम्ही गप्प बसलो. मग हळूच एक धिटुकली

उठली. तिने विचारले, ' बाई ! आपण सांगलीला काय पहायचं? घरी नको का सगळं सांगायला आणि परत आष्टयाला यायचं कधी ?'

आम्हाला पण बाईना हेच विचारायचं होतं.

बाई उत्साहाने म्हणाल्या ' सांगलीचा भुईकोट किल्ला, गणपतीचे देऊळ, आमराई पहायची आणि खरं तर आपणाला जायचं आहे ना ते सांगलीतील विश्राम बागेतील राधाकृष्ण बघायला. त्यांना पहायला आपण आगगाडीतून जायचं बरं का, सायंकाळी परत यायचं !'

बाई सांगत होत्या तसं तसं आम्ही हुरळून गेलो. सांगलीला जाऊन एव्हढं सारं पहायचं ? किती मज्जा आणि विश्राम बागेत राधाकृष्ण बघायचे मग तर मज्जाच मज्जा. आई–बाबांची नाना चऱ्हेने विनवणी करून सहलीसाठी परवानगी मिळवायचीच असं प्रत्येकीनं ठरविलं.

मी दप्तर काखोटीला मारलं. आज तर सुदिन उगवला होता. उतारा आणला नाही म्हणून बाईकडून प्रसाद घ्यायचा वाचले होते. उलट सहलीला जायला मिळणार. शाळेला सुट्टीही मिळाली. माझा आनंद गगनात मावेना. जवळजवळ मी पळतच शाळेबाहेर आले. नस्सिम ही पळत होती. ती माझ्यापुढे होती. मी तिला गाठेल. आम्ही दोघी एकमेकीचा हात धरून घराकडे पळत सुटलो. घर आल्यावर धापा टाकीत मॉसमोर उभे राहिलो. आमचा अवतार बघून ती आम्हाकडे पहातच होती. मग तिने आमच्यावर डोळे वटारले. बहुधा तिला वाटले असावे आम्ही

शाळा चुकवून घरी पळून आलो. म्हणून मी घाईघाईने बाईंनी जे जे सांगितलं होतं ते सर्व सांगितलं. नस्सिमनं माझी री ओढली.

माँ विचारात पडली. थोडं थांबून म्हणाली, ‘ बाबूजी घरी नाहीत, त्यांचं पण सकाळचंच कॉलेज आहे. मग मी तुम्हाला परवानगी कशी देणार ?’

आम्हाला माहीत होते, बाबूजी आम्हाला नाही म्हणणार नाहीत. बाबूजींशी जरा गोड बोलले की लगेच परवानगी हजर. उलट माँच कोणत्याही बाबतीत ताणून धरायची. मी आणि नस्सिम, दोघी दोन बाजूनी माँचा पदर धरून सारखं रडवेल्या आवाजातच म्हणू लागलो, ‘ माँगे माँगे !’ माँला आम्ही नुसतं भंडावून सोडलं. माँनं विचारलं ‘ प्यारनबाई तुमच्याबरोबर येणार आहे का ?’

प्यारनबाई माझ्या वर्गशिक्षिका होत्या. त्या तर येणारच होत्या. नस्सिमने माझ्याकडे उत्सुकतेने पाहिले. मी ‘ हो ’ म्हणून मान डोलवल्यावर तिला बरं वाटलं. माँ गप्प बसली. परत मी विचारलं. ‘ मग जाऊ आम्ही सहलीला प्यारनबाई येणार आहेत !’

माँ अस्पष्ट ‘हो’ म्हणाली. त्यासरशी मी आणि नस्सिमनं आनंदानं गिरकी घेतली.

माँनं तुरीची डाळ भिजत घातली. चपातीस पीठ मळलं. तोपर्यंत माँनं हुकूम सोडला– आटपा तुमचं. हातपाय स्वच्छ धुवा. वेणीफणी करा. पेटीतले नवे फ्रॉक घालून तयार रहा.

आमच्या उत्साहाला भरती आली होती. आम्ही चटपट हातपाय धुतले. नस्सिमला म्हटलं– चल तुझी वेणी घालते. आज न रागवता धुसफुसता तिचे केस न ओढता मी खुषीत तिची वेणी घातली, माझीही घातली. पेटीतून दोघींचे फ्रॉक काढले. आम्ही आमच्या परीने चांगल्या नटून सजून तयार झालो. आणि माँस तिच्या हुकमानुसार स्वयंपाक करण्यास काय भांडी, पाणी वगैरे पाहिजे ते आज्ञा धारकपणे देऊ लागलो. डबा, सांजा डाळकांदा, चपात्यानं गच्च भरला. त्याला पिशवीत दडविला. आम्ही तयार झालो. इतक्यात बाहेर कुठंतरी खेळत असणारी नजमा घरात आली. आम्हाला नटलेलं पाहून तिनं एकदम भोकाड पसरले. धावत येऊन माझा फ्रॉक धरला. म्हणाली, 'मी येणार तुमच्याबरोबर!' आता आली का पंचाईत. मला तर पंख फुटले होते. ते उडायला पहात होते. लवकर लवकर. तर हा नजमाचा घेराव मी आणि नस्सिम माँकडे केविलवाणे होऊन पाहू लागलो.

इतक्यात प्यारनबाईच आमच्या घरी आल्या. त्या माँला म्हणाल्या, 'देताय ना मुमताज–नस्सिमला पाठवून ?'

माँ 'हो' म्हणाली. नजमा रडतच होती. नव्हे तिनं जमिनीवर गडगडा पदर लोळून रिंगणच धरलं होतं. माँ हताश होवून तिच्याकडे पहात होती,

प्यारनबाईनाच नजमाची दया आली. त्या माँला म्हणाल्या, 'द्या तिलाही पाठवून. मी पोरींची काळजी घेते. हिचे आटपा. मी पुढे शाळेत जाते.'

पण मॉंने त्यांना थांबवून आमच्या तिघींचे सहा रुपये दिले. बाई पुढे शाळेत गेल्या. नजमाने रिंगण घालायचे झटक्यात थांबवले. न सांगता ती हातपाय धुवावयास पळाली.मॉं तिचे आटपण्यासाठी तिच्यापाठोपाठ गेली. मी नस्सिम चुळबुळू लागलो. आता आम्हाला नजमास सांभाळावयाची कसरत करावी लागणार होती. एकदांशी नजमा तय्यार झाली. आमचे तिघींचे एकाच ताग्यातील कापड होते. एकाच पद्धतीने शिवले होते. आम्ही बहिणी बहिणी आहोत हे चटकन ओळखून येत होते.

आम्हा तिघींचे लचांड शाळेत हजर झाले. तोपर्यंत बऱ्याच मुली आपआपल्या डब्यांच्या पिशव्या घेऊन शाळेत हजर होत्या.

बाईनी दोन दोन मुली उभ्या करून रांग करायला लावली. आमची रांग स्टॅंडच्या दिशेने चालू लागली. आष्टा, सांगली



जाणाऱ्या बसमध्ये आम्ही सगळी दाटीवाटीने बसलो. बस चालू झाली.

आता खरा निवांत वेळ मिळाला होता. सहलीत काय पहायला मिळणार याची स्वप्नं रंगवायला मला तर केव्हा एकदा राधाकृष्ण पाहीन असं झालं होतं. कृष्णाची मुरली माझ्या कानात ऐकायलासुद्धा येत होती. माझ्या डोळयापुढे कृष्णाचे चित्र उभे राहिले. उजवा पाय किंचीत वाकवून, डाव्या पायाच्या बाजूस आडवा करून हंसरा कृष्ण आपली मुरली ओठी धरून डौलात उभा आहे. मुरलीस गोंडे बांधलेले. पिवळा धम्मक पितांबर नेसलेला, गळयात फुलांचा हार. हातात बाजू बंद. डोकीस मोराचे पीस खोवलेला, सोन्याचा मुकूट, असा कृष्ण आज आम्हाला पहायला मिळणार होता. सोबत राधा होती. जरीकाठी परकर पोलकं नेसून. डोक्यावरुन ओढणी घेतलेली, सोन्या–चांदीचे दागिने, घातलेली राधा कंबरेवर घडा घेऊन येईल. ती फार फार सुंदर असणार राधाकृष्ण आम्हास दिसणार. मग ते आमच्याबरोबर बोलतील का ? आम्हालासुद्धा कृष्णाच्या मंजुळ आवाजनुसार राधेबरोबर नाच करायला मिळणार काय? राधाकृष्णाला पहायला माझे डोळे उत्सुक होते. मन उत्सुक होते. त्यांच्याशी बोलायला नाचायला नाही मिळाले तरी माझी त्याला हरकत नव्हती.

रस्ताभर माझ्या डोळयापुढे राधाकृष्ण नाचत होते. सांगलीला आलो. आता आगगाडीत बसायला मिळणार म्हणून सर्वजणी खूष होत्या. पण आगगाडीत अतिशय गर्दी होती. आम्हाला आमच्या बाई डब्यात अक्षरशः कोंबत होत्या. नजमाला

तर बाईनी वरच्या बर्थवर टाकले. माझ्या हाती डबा होता. नस्सिमने भांबावून माझा फ्रॉक घट्ट धरला होता. आगगाडीने मोऽठ्ठी शिटी वाजवली. तशी नजमाने वरुन किंकाळी फोडली. मी तर गर्दीव वेढून नेले होते. माझा चिमुकला हात तिच्यापर्यंत पोहोचत नव्हता. मदतीला प्यारनबाई नव्हत्या. त्या बहुधा दुसऱ्या डब्यात मुलींच्या दुसऱ्या तुकडीबरोबर होत्या. नजमा घाबरून किंकाळ्यावर किंकाळ्या फोडू लागली. आपल्या बहिणी आता हरवणार अशी तिला धास्ती वाटत होती. मी खालून तिला समजावत होते. नको रडू नको रडू. तरीही ती रडतच होती. मी तिला लालूच दाखविण्यासाठी म्हणाले, 'नजमा रडू नको. अग आता थोड्याच वेळात आपल्याला राधाकृष्ण पहायला मिळणार. कृष्ण सुंदर मुरली वाजवील. आपल्याला ऐकायला मिळेल.

बाजूची मोठी माणसं फिसकन हसली. मी नुसतं त्यांच्याकडं पाहिलं. एवढ्यात विश्रामबाग आली. बाईनी नजमास उतरविलं. ती मला चिकटली. भरभर सारी खाली उतरली.

परत आमची दोन दोन मुलींची रांग केली. तोवर आम्हाला दिसले. आगगाडीतील सगळेच प्रवासी विश्रामबागला उतरले होते आणि झाडीतून दिसणाऱ्या मोठ्या इमारतीकडे भरभर चालले होते काही मोठी मुले तर सरळ पळत होती. त्यानासुद्धा राधाकृष्ण केव्हा पाहीन असे झाले होते वाटते. आम्ही शिस्तीत चालू लागलो. इकडे तिकडे मोठ्या डोळ्यांनी पाहु लागलो. इमारतीजवळ आलो इमारतीसमोरच्या मैदानात खुर्चीची गर्दी होती आणि त्यावर स्त्री-पुरुष बसले होते. एकही

खुर्ची रिकामी दिसत नव्हती. समोर उंच स्टेज केले होते. त्याला छत होते. ते रंगीबेरंगी कापडाचे होते. त्याला लालरंगाची चोहोबाजूंनी झालर होती. स्टेजवर सुंदर खुर्च्या होत्या. एक मोठे टेबलही होते. कांचेच्या ग्लासमध्ये फुलांचा गुच्छ. होता म्हणजे नवलच की ! राधाकृष्ण इथे माणसासारखे खुर्ची टेबलावर बसणार होते की काय ? एवढया गर्दीत बाबूजी त्यांच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांसह आमच्याविरुद्ध बाजूला उभे असलेले दिसले. पण एवढ्या मोऽठ्या गर्दीत आम्ही त्यांचे जवळ जाऊ शकत नव्हतो. आम्ही उभेच राहिलो.

गर्दीचा गलका एकदम वाढला. जो तो म्हणू लागला. ' राधाकृष्ण आले, राधाकृष्ण आले. '

मी उत्सुकतेने मान वळवली. टाचा उंच करून करून पाहिले. काहीच दिसेना. मग म्हटलं, राधा आपल्या पायीचे पैजण रूणझुण करीत येणार, त्याचा आवाज तरी ऐकू. पण पैंजणाचा आवाजही गलक्यामुळे येकू येईना.

सगळे स्टेजकडे पाहू लागले. स्टेजवरील सर्व खुर्च्या भरल्या गेल्या. मी डोळ्यात प्राण आणून तिकडे पहात होते. राधाकृष्ण कुठेच दिसत नव्हती. काही लोक मात्र गरुडी नाक असलेल्या डोळयांवर चष्मा आणि डोकीवर फेटा असणाऱ्या किरकोळ माणसाकडे अदबीनं पहात होती. हसत होती.

कार्यक्रम सुरु होता. जो तो इंग्लिशमध्येबोलत होता. आम्हाला काहीच कळेना. बराच वेळ गेला. मग तो फेटेवाला बाबा हाती, कागद घेऊन इंग्लिशमध्ये जोरात बोलू लागला.

सगळी शांततेन ऐकत होती. मी बाबूजींकडे पाहीले.ते मन लावून शब्द न शब्द ऐकत होते.मी मात्र अजून राधाकृष्ण आपणास का दिसत नाही म्हणून विचार करत होते.

फेटेवाल्याचे भाषण संपले. तसे काही लोक उठून उभे राहिले व चालू लागले. आम्हालाही बाईने रांगेत उभे करून चालू केले. रस्याने जाताना माणसे म्हणत होती. राधाकृष्णनं किती विद्वान माणूस. काय सुंदर भाषण केलन.

सांगलीत आमराईत जेवण केले. भुईकोट किल्ला पाहीला. बाईनी सांगितल्या प्रमाणे सर्व आम्हास दाखवले.

आम्ही मात्र हिरमुसून गेलो होतो. सहलीची सारी मज्जाच निघून गेली होती. राधा तिच्या घड्यासह दिसली नाही की कृष्ण मुरलीसह दिसला नाही, राधाकृष्णानी आम्हाला का बंर दर्शन दिलं नाही ? तो फेटेवाला बाबा कोण होता ? राधाकृष्ण पहायला मिळाले नाही म्हणून फार वाईट वाटत होते.

☐ ☐

बाल वाङ्मय विभाग
दिनांक